संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ४७८/२०२२

महाराष्ट्र शासन/ सोमनाथ क्षीरसागर.

निशाणी क्र.१६

MHOS090021652022

<u>**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ ची जबानी शपथेवर सुरू...**</u>

**मी ईश्वराला स्मरून शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपूर्ण खरे सांगेन व ख-याशिवाय काहीही सांगणार नाही.**

**साक्षीदाराचे नाव : गजानन मधुसुदन जाधव.**

**वय** **:** ३२ वर्षे,

**व्यवसाय** **:** व्यापार - दुकान ,

**पत्ता** **:** रा. मेन रोड कळंब , ता. कळंब, जि. धाराशिव.

<u>**साक्षीदार क्र.१ चा सरतपास अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्री. एस. टी. वैद्य यांचे मार्फत**</u>

१. मला २१/०३/२०२२ रोजी पोलीसांनी पोलीस स्टेशन कळंब येथे बोलाविले होते. पोलीस स्टेशन कळंब येथे पोलीसांनी माझ्या को-या कागदावरती सह्या घेतल्या. आता मला अभिलेखावरील पंचनामा दाखविण्यात आला. त्यावरती अनुक्रमांक १ वरती माझी सही आहे. सदरच्या सहीस <u>**निशाणी क्रमांक १७**</u> देण्यात येत आहे. ज्या कागदावर पोलीसांनी माझ्या सह्या घेतल्या तो मजकूर मला माहिती नाही.

**(साक्षीदार अभियोग पक्षास सहाय्य करत नसल्याने सरकारी वकिलांनी साक्षीदारास उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली.)**

२. हे म्हणणे खरे नाही की, दि. २१/०३/२०२२ रोजी पोलीसांनी पापडे गल्ली, एस.बी. आय. बँकेकडे जाणा-या रोडवरती आरोपीच्या राहते घरी पंचनामा करणेकरिता मला घेउन गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी व दुसरा पंच यांच्या समक्ष पोलीसांनी १३:१५ वाजता छापा मारला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या राहत्या घरी छापा मारला असता महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेल्या सुगंधित तंबाखुजन्य पदार्थ मिळून आले. ज्यामध्ये -

१. प्रिमीयम राज निवास सुगंधित पान मसाला चे एकुण २५ पाकिटे प्रत्येकी किं. १९२ रू. एकूण किं. ४८००/- रू.

२. रोयल २२० तंबाकु चे एकूण ४० पाकिटे प्रत्येकी किं. ६५रू. एकूण किं.२६००/-रू

३. प्रिमीयम एक्स एल-०१ जाफरानी जर्दा एकूण ४० पाकिटे प्रत्येकी किं. ४८ रू. एकूण १९२०/- रू.

४. करमचंद प्रिमीयम पान मसाला एकूण ५ पाकिटे प्रत्येकी किं.१६० रू. एकुण किंमत ८००/-रू.

५. केसी-१००० जाफरानपी जर्दा एकुण २१ पाकिटे प्रत्येकी किं. ४० रू. एकुण किं. ८४०/-रू.

६. विमल पान मसाला एकुण २१ पाकिटे प्रत्येकी किं. १२० रू. एकुण २५२०/-रू.

७. वी-१ तंबाकु एकुण ३९ पाकिटे प्रत्येकी ३० रू. एकुण ११७०/-रू.

८. एक्का प्रिमियम एकूण ३ पाकिटे अंदाजे किंमत प्रत्येकी २००/-रू. एकूण ६००/-रू.

९. गोवा-१००० एकूण ३ पाकिटे अंदाजे किंमत प्रत्येकी २३०/-रू. एकूण ६९०/-रू.

१०. एम सेंटेड तंबाकु एकूण २ पाकिटे प्रत्येकी किंमत ३००/-रू एकूण ६००/-रू.

११. केसर युक्त विमल पान मसाला (७ पउंच) एकूण १० पाकिटे प्रत्येकी किंमत २८/-रू. एकूण २८०/-रू.

एवढ्या साहित्याचा समावेश असलेला ज्याची एकुण किंमत रू. १६८२०/- इतका मुद्देमाल मिळून आला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी सदरचा मुद्देमाल माझ्या समक्ष जप्त केला. हे म्हणणे खरे नाही की पोलीसांनी जप्ती पंचनामा माझ्या समक्ष केला.

३. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी सदरचा पंचनामा मला वाचून दाखविलेनंतरच माझ्या व दुस-या पंचाच्या सह्या घेतल्या. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी नामे सोमनाथ क्षीरसागर हे माझ्या ओळखीचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या ओळखीचे असल्याने आज रोजी मी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपीतर्फे सन्माननीय विधीज्ञ एम.के.मुळीक यांनी नाकारला.</u>**

**<u>फेरतपास नाही.</u>**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत**

**सही/-**

**दिनांक: १३.०३.२०२५** **(श्रीमती ए.डी. जाधव)**

**ठिकाण: कळंब** **न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,**

**(कोर्ट क्र.४)कळंब.**